## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.७ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे संशोधक विद्यार्थी डॉ.सोपान नांगरे यांना एक लाख रुपयांचा "गांधीयन यंग टेक्नॉलॉजीकल इनोव्हेशन ॲप्रिसिएशन पुरस्कार" जाहिर झाला आहे.

सोसायटी फॉर रिसर्च ॲ ण्ड इनिशिएटिव्ह फॉर सस्टेनेबल टेक्नॉलॉजीज ॲ ण्ड इन्स्टिट्यूशन्स यांच्या तर्फे हा पुरस्कार दिला जातो. नवकल्पनांना समर्थन देण्यासाठी अभियांत्रिकी, विज्ञान व तंत्रज्ञान, वैद्यकीय या क्षेत्रांसाठी दरवर्षी हे देशपातळीवरील पुरस्कार जाहिर होतात. अत्यंत प्रतिष्ठेचा हा पुरस्कार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील संशोधक विद्यार्थी डॉ. सोपान नागरे यांना जाहीर झाला आहे. यापुर्वी त्यांनी अविष्कार आणि अन्वेषण या संशोधन स्पर्धांमधेही पुरस्कार प्राप्त केले आहेत. डॉ. नांगरे यांनी "डिझाईन ऑफ ऑफर्डेबल सरफेस डेकोरेटेड ग्राफिन ऑक्साईड नॅनोकंपोझाईटस् फॉर लेबल फ्रि प्रोग्नोसिस ऑफ अल्झायमर डिसिज" यावर केलेल्या नाविन्यपूर्ण संशोधनासाठी हा गांधीवादी तरुण तंत्रज्ञान इनोव्हेशन पुरस्कार जाहिर झाला आहे. कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी,प्र-कुलगुरु एस.टी.इंगळे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### बातमी क्र. २

जळगाव दि.७ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात दि. ८ व ९ ऑक्टोबर रोजी शिक्षकांची क्षमता वाढविण्याच्या अनुषंगाने कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत ही कार्यशाळा शिक्षणशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आली आहे. भविष्यातील शिकण्याचा मार्ग, शिक्षण व संशोधनात एआय चा वापर, ई सामुग्री विकास, डिजीटल कोर्सेस, शिक्षण व्यवस्थापन प्रणाली, ई-परीक्षा व ई-मुल्यमापन या विषयावर दोन दिवसात मंथन होणार असून त्यामध्ये डॉ.वैभव सबनिस, डॉ.इरबा गायकवाड, प्रा. सुरेश इसावे, प्रा.कैलास चौधरी, प्रा.बराट आदी मार्गदर्शन करणार आहेत अशी माहिती शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख डॉ.मनिषा इंदाणी यांनी दिली.

### बातमी क्र. ३

जळगाव दि.७ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान केंद्राच्या वतीने तीन जिल्ह्यात शालेय विद्यार्थ्यांपर्यंत मोबाईल सायन्स व्हॅन पोहचविण्यासाठी परिश्रम घेणाऱ्या प्राध्यापक,विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांचा कुलगुरु प्रा. व्ही.एल.माहेश्वरी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

जळगाव, धुळे व नंदुरबार या तीन जिल्ह्यात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये २७ शाळांमध्ये ही मोबाईल सायन्स व्हॅन पोहचली. जवळपास ५ हजार विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला. या व्हॅनमध्ये ३० पेक्षा अधिक विज्ञान प्रयोग ठेवण्यात आले आहेत. कुलगुरु प्रा. माहेश्वरी, प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, केंद्राचे समन्वयक प्रा.संजय घोष,प्रा.नवीन दंदी, प्रा.अमरदीप पाटील,प्रा. राजू आमले, मोहिनीराज नेतकर, प्रयोगशाळेसाठी काम करणारे पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी, केंद्रातील कर्मचारी संकेत खंडारे,दीपक तायडे आदी यावेळी उपस्थित होते.

..........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४      दिनांक: ७ ऑक्टोबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.७ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील मुलांच्या वसतिगृहात उद्या मंगळवार दि. ८ ऑक्टोबर रोजी कर्मवीर व्यंकटराव रणधीर व्याख्यानमाले अंतर्गत सामाजिक कार्यकर्ते अमृत बंग यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

मुलांचे वसतिगृह क्र. ३ येथे सायंकाळी ६ वाजता अमृत बंग हे 'निर्माण: युवांच्या अर्थपूर्ण जीवनाचा शोध' या विषयावर संवाद साधणार असून प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे अध्यक्षस्थानी असतील. शिरपूरच्या कर्मवीर व्यंकटराव रणधीर प्रतिष्ठान यांनी दिलेल्या देणगीतून या व्याख्यानाचे आयोजन केले जाणार आहे. अशी माहिती कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी दिली.

**बातमी नं. २**

जळगाव दि.७ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळे अंतर्गत असलेल्या महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्रातर्फे गांधी सप्ताह निमित्त घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत जान्हवी सपकाळे हिने प्रथम तर भित्तीपत्रक स्पर्धेत दिव्या पाटील या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक प्राप्त केला.

गांधी सप्ताह निमित्त घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत २५ तर भित्तीपत्रक स्पर्धेत २० स्पर्धक सहभागी झाले होते. वाढत्या हिंसेला गांधीजींची अहिंसा हेच उत्तर, गांधीवादी सिध्दांताची वर्तमानकाळात प्रासंगिकता आणि गांधीजींच्या दृष्टीने आत्मनिर्भर भारत हे विषय वक्तृत्व स्पर्धेसाठी देण्यात आले होते. भित्तीपत्रक स्पर्धेसाठी मोहन ते महात्मा, महात्मा गांधीचे रामराज्य आणि स्वच्छतेपासून समृध्दीकडे हे विषय होते. वक्तृत्व स्पर्धेत जान्हवी सपकाळेने प्रथम, तेजस्विनी पाटीलने द्वितीय तर अमोल पाटीलने तृतीय क्रमांक प्राप्त केला. भित्तीपत्रक स्पर्धेत दिव्या पाटील प्रथम, दामिनी पाटील द्वितीय आणि अमृता सूर्यवंशीने तृतीय पारितोषिक प्राप्त केले. यावेळी प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा.म.सु. पगारे, व्य.प. सदस्य डॉ. पवित्रा पाटील, अधिसभा सदस्य डॉ. विशाल पराते आणि केंद्राचे विभागप्रमुख डॉ. उमेश गोगडीया उपस्थित होते. या दोन्ही स्पर्धांसाठी परीक्षक म्हणून डॉ. मनिषा इंदाणी, डॉ. अतुल बारेकर तसेच डॉ. पवित्रा पाटील व डॉ. विशाल पराते यांनी काम पाहिले. समन्वयक म्हणून प्रा. प्रदीप गोफणे, प्रा. रोशन मावळे यांनी काम पाहिले.

**बातमी नं. ३**

जळगाव दि.७ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळा आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोशल डिफेन्स, मिनीस्ट्री ऑफ सोशल जस्टीस ॲन्ड एम्पावरमेंट, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने दि.10 ऑक्टोंबर 2024 रोजी 'ट्रान्सजेंडर आणि प्रशासनाची भूमिका' या विषयावर विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे प्रशाळा सभागृहात एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेचे उद्घाटन सकाळी 10:30 वाजता जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ.विनोद पाटील राहतील. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा पोलीस अधिक्षक डॉ.महेश्वर रेड्डी हे उपस्थित राहणार आहेत. या एक दिवसीय कार्यशाळेत दोन सत्र होणार असून पहिल्या सत्रात मनपा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सहायक आयुक्त योगेश पाटील, दुस-या सत्रात जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ.सुनील पाटील हे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेचा समारोप दुपारी 1:30 वाजता उपजिल्हाधिकारी अरविंद अंतुर्लीकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी नोंदणी अनिवार्य असून दि.10 ऑक्टोंबर सकाळी 9:30 ते 10:00 या वेळेत विनामूल्य नोंदणी करता येईल. या कार्यशाळेत प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक तथा कार्यशाळेचे मुख्य निमंत्रक प्रा.डॉ.सुधीर भटकर, सहनिमंत्रक डॉ.गोपी सोरडे, ॲड.सूर्यकांत देशमुख यांनी केले आहे.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ७ ऑक्टोबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी